# शेतकरी संघटक

वर्ष १२ वे
अंक १४ वा
६ डिसेंबर १९९५
पाक्षिक
वार्षिक वर्गणी रू. ३०
किंमत १ रूपया २५ पैसे


१४ डिसेंबरचे

# उपोषण – मक्तेदारीची बेडी तोडण्यासाठी

**– शरद जोशी**

दि. १४ डिसेंबर १९९५ पासून मी अनिश्चित काळपर्यंत उपोषणाला सुरुवात करणार आहे. उपोषण या साधनाची फारशी शुचिता राहिलेली नाही, महत्त्वही राहिलेले नाही; दंगे, मारामाऱ्या, गुंडागर्दी अशा साधनांनी आपले म्हणणे पुढे मांडण्याचा सध्याचा काळ आहे; सुंदरलाल बहुगुणांसारख्यांच्या उपोषणाकडेही साठसाठ दिवस दुर्लक्ष केले जाते. हे सगळे माहीत असूनही मी उपोषणाचा निर्णय घेतला आहे. गेल्या फेब्रुवारीपासून माझी शारीरिक प्रकृती बरी नाही हे ठाऊक असूनही मी हा निर्णय घेतला आहे.

निर्धाराने आत्मक्लेशाचे साधन वापरण्याखेरीज गत्यंतर नाही. आज आहे ते साधन न वापरता मी स्वस्थ राहिलो तर पुढे भविष्यात स्वतःला माफ करू शकणार नाही अशी मनाची खात्री झाल्यामुळे मी हा निर्णय घेतला आहे.

कोणत्या उद्दिष्टाने एवढे साहस करण्यास मी निघालो आहे? कोणत्या मागणीसाठी? यावेळी मागणी रुपया-पैशांची नाही, शेतीमालाच्या भावाचीही नाही; कापसाला किंवा उसाला योग्य किंमत मिळावी म्हणूनही हा मार्ग मी स्वीकारलेला नाही. मागणी आहे ती फक्त स्वातंत्र्याची.

**‘स्वातंत्र्य मोर्चा’ची धारणा**

१२ डिसेंबर रोजी नागपूर जिल्ह्यातील नरखेड येथे लक्षावधी कापूसउत्पादक शेतकरी जमणार आहेत. तेथून मध्यप्रदेशाची सरहद्द ओलांडून पांढुर्णा येथील बाजारपेठेत ते पिशवीपिशवी कापूस घेऊन जाणार आहेत. त्यांची मागणी कापसाला अधिक भाव मिळावा अशी नाही. उलट, सध्याच्या महाराष्ट्र शासनाने जुन्या सत्ताधाऱ्यांची दुष्ट नीति सोडून महाराष्ट्रातील कापसास आधारभूत किंमतीच्या तुलनेने वाढीव भाव देऊ केला आहे. याबद्दल महाराष्ट्र शासनाचे मी कौतुकही केले आहे. पण कापूस एकाधिकार योजनेस एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली आणि ती योजना पुढे चालू ठेवण्याचा याही शासनाचा इरादा आहे. गेली पंचवीस वर्षे एकाधिकार या गोंडस नावाखाली पुढारी, अधिकारी आणि गिरणी मालक यांनी एकत्र येऊन शेतकऱ्यांना अब्जावधी रुपयांना बुडवले. आणि, असेच बुडवत राहण्याचा त्यांचा इरादा आहे. या एकाधिकाराला विरोध करण्यासाठी शेतकऱ्यांचा हा ‘स्वातंत्र्य मोर्चा’ आहे. विरोध सरकारी खरेदीला नाही, सरकारी मक्तेदारीला आहे. कास्तकारांनी पिकवलेला कापूस त्यांना मर्जीप्रमाणे कोणत्याही देशी किंवा विदेशी बाजारपेठेत विकण्याचे, त्यावर प्रक्रिया करण्याचे किंवा त्याची वासलात लावण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे ही स्वातंत्र्य मोर्चाची धारणा आहे.

**झोनबंदी**

महाराष्ट्रातील ऊसशेतकऱ्यांचा प्रश्न कापसाप्रमाणेच राजकीय पुढारी, सहकार महर्षि, अधिकारी आणि व्यापारी यांनी गुंतागुंतीचा करून ठेवला आहे. सहकारी कारखानदारीत सहकाराचे तत्त्व नावालासुद्धा नाही. साखर कारखाना कसा उघडायचा, कुठे उघडायचा, कोणी उघडायचा हा निर्णय केंद्र शासनाचा. सत्ताधारी पक्षाच्या म्होरक्यांच्या सोयीसाठी कारखाने उघडले जातात. सरकारचे लेव्हीचे धोरण, साखरेच्या बाजारावरील नियंत्रणे, निर्यातीवरील बंदी यांमुळे उसाला उत्पादनखर्च भरून येण्याइतकाही भाव मिळत नाही. कारखान्याच्या पातळीवर अकार्यक्षमता, भ्रष्टाचार यांमुळे उत्पादक शेतकरी मोठा अडचणीत आला आहे. त्याचा काहीही दोष नसताना काही कारखाने दोनशे ते तीनशे रुपये प्रतिटनच भाव देऊ शकतात. तर काही कारखान्यांनी गेल्या वर्षी रू. ११००/- च्या वर प्रती टन भाव दिला होता. यावर काँग्रेस सरकारने मोठी विचित्र तोड काढली. ज्या त्या कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील सर्व शेतकऱ्यांनी त्याच कारखान्यास ऊस घातला पाहिजे असे फर्मान काढले. शेतकरी सहकारी कारखान्याचा भागधारक सदस्य असला तरीही ऊस त्याचा कारखान्यास देण्यास बांधलेला का असावा? कारखाना काढण्यास त्याने भांडवल पुरवले याचा अर्थ त्याने सदासर्वकाळ ऊस त्याच कारखान्याच्या खड्ड्यात लोटला पाहिजे असे नाही! जे शेतकरी कारखान्याचे सदस्य नाहीत, एवढेच नव्हे तर, ज्यांना कारखाने सदस्य करून घेण्यास तयार नसतात त्यांच्यावर तर असे बंधन घालणे अगदीच अन्याय्य आहे. शेतकऱ्यांनी कारखान्यास घातलेल्या उसावर सरकार खरेदी-कर लावते याचा अर्थ कारखान्यास ऊस देणे हा व्यवहार

२३ नोव्हेंबर १९९५ रोजी पुणे येथे साखर मुक्तीमोर्चासमोर सरकारी मक्तेदारीची बेडी तोडण्यासाठी १४ डिसेंबरपासून अनिश्चितकालीन उपोषण करण्याची घोषणा शरद जोशी यांनी केली. (छायाचित्र दै. सकाळ यांच्या सौजन्याने)

खरेदी-विक्रीचा आहे आणि कोणाही सदस्यास किंवा बिगर सदस्यास अमक्या कारखान्यालाच ऊस वीक अशी सक्ती करता येणे योग्य नाही. आपण पिकविलेला ऊस मर्जीप्रमाणे विकणे, त्यावर प्रक्रिया करणे, आणि त्याची वासलात लावणे याचे स्वातंत्र्य ऊसउत्पादकाला पाहिजे. त्या स्वातंत्र्यासाठी तो आज लढ्यास सिद्ध झाला आहे.

### व्यवस्था खुली तरी शेतीला 'उलटी पट्टी'च

१९९१ साली लायसन्स-परमिट व्यवस्था संपून खुली व्यवस्था आणण्याची घोषणा झाली तेव्हापासून बिगरशेती क्षेत्रावरील बंधने काहीशी मोकळी झाली आहेत. शेतीमालाचे उत्पादन, व्यापार, प्रक्रिया, निर्यात यावरील बंधने पहिल्यासारखीच शाबूत आहेत. दहा वर्षांपूर्वी शासनाने शेतकऱ्यांवर २४००० कोटी रुपयांची उलटी पट्टी लादल्याचा कबुलीजबाब दिला आहे. शेतीच्या लुटीची ही रक्कम १९९२-९३ साली ४२,७०० कोटी रुपयांपर्यंत वाढली आहे. शेतकरी आणि शेती व्यवसाय यांचे स्वातंत्र्य हा देशापुढील सर्वात महत्त्वाचा प्रश्न झाला आहे.

दुर्दैवाने, राष्ट्रीय विषय पत्रिकेवरही आर्थिक प्रश्न जाणीवपूर्वक पुसले जात आहेत आणि त्याऐवजी देवळे, समान नागरी कायदा, बैलहत्या असल्या प्रश्नांना महत्त्व देण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न चौफेर यशस्वी होताना दिसतो आहे. राष्ट्रीय पातळीवर आर्थिक समस्यांना पुन्हा एकदा महत्त्वाचे स्थान मिळावे याकरिता निकराचे प्रयत्न करण्यात आपण कमी पडलो तर नव्या नाझीवादाचा भस्मासूर देशापुढे उभा राहणार आहे.

### न्यायालयातूनही न्याय शक्य नाही

उसाला झोनबंदीचा प्रश्न न्यायालयाच्या मार्फत सोडवून घेण्याचा आटोकाट प्रयत्न न परवडणाऱ्या रकमा खर्चून संघटनेने केला. एवढेच नव्हे तर बिगर सदस्यांचा ऊस कार्यक्षेत्रातील कारखान्यांना हवा असेल तर त्यासाठी निदान ७४० रुपये प्रतिटन इतका भाव दिला पाहिजे असाही निवाडा दिला. शेतकरी ऊस घेऊन दुसऱ्या कारखान्याच्या कार्यक्षेत्रात जात असतील तर त्यांच्यावर बळाचा प्रयोग करू नये असाही स्पष्ट आदेश दिला. या निर्णयावर सर्वोच्च न्यायालयाचेही शिक्कामोर्तब झाले होते. एका तांत्रिक मुद्द्यांकरिता प्रकरण औरंगाबाद खंडपीठाकडे परत पाठविण्यात आले. खंडपीठाच्या दुसऱ्या निर्णयावर सरकारने पुन्हा एकदा सर्वोच्च न्यायालयात प्रकरण नेले आणि शेवटी सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय शेतकऱ्यांविरुद्ध गेला. जीवनावश्यक वस्तूंच्या कर्झनशाही कायद्याच्या सुल्तानशाहीचा हा आणखी एक नमुना. अमुक अमुक कार्यवाही ही वस्तूंचा पुरवठा सुरळीतपणे चालू ठेवण्यासाठी आवश्यक आहे असे 'सर्टिफिकेट' शासनाने दिले की न्यायालयाचा काही इलाज राहात नाही. ऊसउत्पादक शेतकऱ्यांवर अन्यायांचे कडेलोट झाले आहेत. खरेदीकर, अनेक कपाती, बिगर परतीच्या ठेवी, कमी भाव ही सगळी बेबंदशाही सहकाराच्या नावाखाली उभ्या केलेल्या मक्तेदारीमुळे टिकू शकते.

### म्हणून....

या मक्तेदारीची बेडी तोडण्याच्या निर्धाराने मी १४ डिसेंबर १९९५ पासून माझ्याकडून जे काही होण्यासारखे आहे त्यांची पराकाष्ठा करण्यास सिद्ध झालो आहे. महाराष्ट्रातील आणि देशभरच्या शेतकरी, बिगर शेतकरी सर्व स्वातंत्र्यप्रेमींनी या कार्यास आशिर्वाद द्यावा आणि प्रत्येकाला या लढ्याला जो हातभार लावणे शक्य असेल तो तो त्याने लावावा ही इच्छा.

२ डिसेंबर १९९५

**बळीराज्य ही शेतकऱ्याची मागणी नाही**
**बळीराज्य ही निसर्गाची तहान आहे.**

# ‘आर्थिक सुधार आणि शेतीक्षेत्र’

## कार्यशाळा, २४-२५ नोव्हेंबर १९९५

‘आर्थिक सुधार आणि शेतीक्षेत्र’ या विषयावर २४/२५ नोव्हेंबर १९९५ रोजी कृषि अर्थ प्रबोधिनी, आंबेठाण व प्रोजेक्ट फॉर इकॉनॉमिक एज्युकेशन, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे येथे एक कार्यशाळा भरविण्यात आली होती. या कार्यशाळेत श्री. शरद जोशी यांनी मांडलेल्या खालील मुद्द्यांच्या अनुषंगाने चर्चा करण्यात आली.

१. केंद्र शासनाने स्वीकारलेल्या आर्थिक सुधारांच्या कार्यक्रमातून शेतीक्षेत्राला पूर्णपणे वगळले आहे हे आता सर्वमान्य आहे; आर्थिक सुधारांची भाषा करणाऱ्यांच्या कार्यक्रमपत्रिकेत ‘आर्थिक सुधार’ हा विषयच नाही हे बहुधा फारच थोड्या जणांच्या ध्यानात आले असावे.

२. स्वातंत्र्योत्तर काळातील दुहेरी अर्थधोरणांमुळे शेतीक्षेत्राचा बळी गेला आहे; इंडियातील कारखानदारी ही जगामधील पराकोटीचे संरक्षण लाभलेली तर शेतीक्षेत्र पराकोटीचे शोषित झालेले आहे.

३. आर्थिक सुधारांचा कार्यक्रम स्वीकारल्यानंतरही शेतीच्या बाबतीतील सापत्न वागणूक चालूच राहिली आहे. शेतीसाठी प्रामुख्याने वीज, पाणी, रस्ते यासारख्या संरचना, संस्था आणि तंत्रज्ञानामध्ये सुधारणा तर इतर क्षेत्रांना स्पर्धात्मक बाजारपेठा आणि कार्यक्षम लोकसेवा उपलब्ध व्हावी असे वातावरण.

४. परिणामी, काही अप्रत्यक्ष लाभ वगळता कारखानदारीच्या संरक्षणातील कपात, शेतीमालाचा व्यापार व निर्यात यांवरील निर्बंधातून जुजबी सूट आणि रुपयाच्या विनिमयाचा वास्तव दर यांच्यामधून शेतीक्षेत्राला नगण्य लाभ मिळाला आहे.

५. शेतीक्षेत्राला किंवा शेतीसंबंधीत उद्योगांना परवानामुक्तीचा स्पर्शही झालेला नाही; शेतीमालाच्या देशांतर्गत व्यापारावरील निर्बंध जवळ जवळ जसेच्या तसे चालूच आहेत, शेतीमालाच्या निर्यातीवरील निर्बंध तसेच शेतीमालाची ‘अव्यापारेषु’ आयात चालूच आहे. शेतीमालावरील उणे सबसिडी अजून वाढतच आहे आणि उलट उणे सबसिडी बंद करण्याची कारवाई करण्याआधीच शेतीच्या नावाने खत, वीज इत्यादींच्या उत्पादकवितरकांना दिल्या जाणाऱ्या सबसिडींमध्ये कपात करण्याची घाई केली जात आहे. उत्पादकतेसाठी किमान कार्यक्षम जमीनधारणा होण्याच्या दृष्टीने कमाल जमीनधारणा कायद्यामध्ये काही बदल करण्याचा कुठे विचार दिसत नाही. अकार्यक्षम सहकार क्षेत्राला सबसिडी देणे चालूच आहे. याबरोबरच, शेतीमालाच्या बाजारपेठेतील सरकारी हस्तक्षेपामुळे देवघेवीच्या अटी अधिकाधिक शेतकरीविरोधी होत आहेत.

दि. २४ नोव्हेंबर १९९५ रोजी दुपारी ३ वाजता कार्यशाळेला सुरुवात झाली. प्रोजेक्ट फॉर इकॉनॉमिक एज्युकेशनचे श्री. एस.व्ही. राजू यांनी प्रास्तविक केले. कार्यशाळेच्या चर्चेतील सूत्र मांडण्यासाठी श्री. शरद जोशींनी प्रास्तविक भाषण केले. आर्थिक सुधारांतून शेतीला वगळले असले तरी शेतीच्या बाबतीतील दृष्टिकोनात काही बदल झाल्याचेही त्यांनी सांगितले.

★ शेतीला केवळ उपजिविकेचे साधन न समजता त्याकडे व्यवसाय म्हणून पहायला सुरूवात झाली आहे. देवघेवीला शेतीमध्येही महत्त्व आहे हे आता स्वीकारले जात आहे.

★ ‘कुलक’ वगैरे शब्द वापरून शेतीची हेटाळणी करण्याचे तसेच सूट, सबसिड्या मिळविणारे, शेतमजुराची आणि भूमिहीनांची पिळवणूक करणारे, करबुडवे अशी शेतकऱ्यांची अवहेलना बंद झाली आहे.

★ भारत हा अजूनही कृषिप्रधान आहे. एकीकडे स्पर्धेला सामोरे जा म्हटल्यानंतर कारखानदार ‘सपाट मैदाना’ची आग्रही मागणी करीत असताना गेले अर्ध शतक ज्यांना सावत्रपणाची वागणूक मिळाली असली तरी ते शेतकरी जगाच्या बाजारपेठेत स्पर्धा करू शकतात हे आता सर्वजण मान्य करू लागले आहेत.

★ उणे सबसिडीच्या मार्गाने शेतीचे योजनाबद्ध शोषण झाले आहे; पाणी, वीज, खते इत्यादींवरील अधिक सबसिडीतून त्याची अल्पांशाने भर केल्याचे भासविले जाते यालाही आता मान्यता मिळाली आहे. कारखानदारीला प्राधान्याने दिलेले संरक्षण हे अप्रत्यक्षपणे शेतीवरीलच बोजा ठरले आहे हेही आता सर्वजण कबूल करू लागले आहेत.

दुर्दैवाने, वास्तवाचे नव्याने येऊ लागलेले हे भान अजून कृतिकार्यक्रमात किंवा उपायोजनेमध्ये रूपांतरित होताना दिसत नाही. अर्थतज्ज्ञ आणि राजकारणी मुद्द्यांचा गोंधळ आणि कार्यक्रमांची गल्लत करून प्राथमिक उत्पादनक्षेत्राबद्दलचा जुनाच दुराग्रह चालू ठेवू इच्छित आहेत. त्यामुळे, उणे सबसिडीचा मतितार्थ काढताना गोंधळ निर्माण केला जातो. आंतरराष्ट्रीय दर व आधारभूत किंमती यांच्यामधील हा फरक केवळ वाटाघाटींसाठी काढलेला आहे त्यामुळे भारतात त्याला कार्यवाहीच्या दृष्टीने काही महत्त्व नाही अशी मांडणी करण्याचा प्रयत्न केला जातो. २२ शेतीमालांवरील एकूण २४००० कोटी रुपयांची उणे सबसिडी मोठ्या हातचलाखीने, समग्र शेतीमालांच्या किंमतीशी तुलना करून (उणे ७२ टक्के नसून) केवळ उणे २२.८५ टक्के असल्याचे ठसवण्याचा प्रयत्न केला गेला.

पण, अखेरी वास्तव मान्य करून उपाययोजना सुचविण्याचा प्रसंग पुढे ठाकला तेव्हा बऱ्याच तज्ज्ञांनी शेतीच्या संरक्षणाबाबत उलटी दिशा घेणे, शेतीमालाचा देशांतर्गत व्यापार व निर्यात यांवरील निर्बंध उठविणे या आवश्यक उपायांबाबत तोंडात गुळणी धरून संरचना, तंत्रज्ञान यांच्याशी संबंधित कार्यक्रमांची भली मोठी यादी बनवायला सुरुवात करून लुच्चेगिरी केली; जेणेकरून शेतीमालाच्या व्यापाराच्या खुलीकरणाची प्रक्रिया दडपली जावी. परिणामी, आर्थिक सुधारांच्या आधीच्या कार्यक्रमांच्या ढिगाखाली शेतीमालाचा व्यापार निर्बंधमुक्त करण्याचा विचार गुदमरून गेला.

शरद जोशींनी आपल्या मांडणीच्या पुष्टीसाठी केंद्रीय अर्थखात्याच्या अनेक दस्तावेजांचा तसेच अनेक चर्चासत्रांच्या अहवालांचा आधार दिला. आपल्या या प्रास्तविक भाषणाच्या शेवटी त्यांनी, केंद्रीय अर्थमंत्र्यांनी किमान कार्यक्षम जमीनधारणेसाठी शेतजमिनीचे एकत्रीकरण, स्वस्त धान्यवितरण व्यवस्थेत फेरबदल, लहान शेतकऱ्यांसाठी शेतीमाल प्रक्रिया संकुल, इत्यादी संबंधी वेळोवेळी मांडलेल्या काही प्रस्तावांचा निर्देश केला आणि हे सर्व प्रस्ताव गेली चार वर्षे धूळ खात पडले असल्याचे सांगितले. त्यानंतर श्री. शरद जोशींनी सूचित केल्यानुसार ही कार्यशाळा तीन सत्रात चालली. या कार्यशाळेत शरद जोशी, गंगाधर गाडगीळ, प्रभाकर अमीन, महेश भट्ट, मधु कीश्वर, भूपेंद्रसिंग मान, गोपाल अय्यर सत्यनारायण, सोपान कांचन, राहूल म्हस्के, प्र.बा.भोसले, कनामे, वंदना सोनाळकर, बिपिनभाई देसाई, पी.एस.ठाकरे, मनमोहनसिंग एस्.व्ही.राजू, श्रीपाद दाभोळकर इत्यादींनी भाग घेतला.

कार्यशाळेच्या शेवटी निष्कर्ष काढण्यात आला की,

★ नियोजन हे त्याच्या स्वभावानुसार विद्रूप करणारी प्रक्रिया आहे आणि केंद्रीय पातळीवरून नियोजनामुळे होणारे नुकसान तर कल्पनेच्याही पलीकडे प्रचंड होते.

★ गेल्या अर्धशतकाच्या नेहरू नियोजनाच्या काळात देशाच्या हिताची हानी होत होत वेगवेगळ्या रंगाढंगाचे राजकारणी, तसेच नियोजन व्यवस्थेच्या अवतीभोवती राहिलेले अर्थशास्त्रज्ञ, व्यापार आणि कारखानदारीतील प्रस्थापित यांचे हितसंबंध जोपासले झाले.

★ सरकारी नियोजनामुळे फक्त वशिलेबाज भांडवलशाहीची भरभराट झाली; सत्ता किंवा प्रशासनामध्ये आवश्यक ते लागेबांधे असल्याखेरीज सूटसवलत मिळणे अशक्य होते.

• • •

## ऊस-झोनबंदी-मुख्यमंत्री

उसाची झोनबंदी रद्द करा म्हणून २३ नोव्हेंबरच्या साखरमुक्ती मोर्चाचे वेळी शरद जोशींनी मुख्यमंत्र्यांना आवाहन केले. १४ डिसेंबर पर्यंत हे न झाल्यास आपण उपोषण करू असेही त्यांनी जाहीर केले.

२४ नोव्हेंबर १९९५ रोजी मुख्यमंत्री आंबेठाण जवळील महाळुंगे (इंगळे) येथे काही कार्यक्रमानिमित्त होते. इतके आर्थिक प्रश्न समोर असतांना मुख्यमंत्र्यांनी जाहीर सभेत फक्त शासनाच्या कल्याणकारी योजनांबद्दल भाषण केले.

नंतर वार्ताहरांनी शरद जोशींच्या उपोषणाच्या घोषणेचा संदर्भ देऊन झोनबंदीसंबंधी प्रश्न विचारला असता मुख्यमंत्र्यांनी झोनबंदी असणे चुकीचे आहे, पण ती रद्द करण्याचे अधिकार आपल्याला नाहीत, मंत्रीमंडळाला आहेत असे म्हटले.

दरम्यान मुख्यमंत्र्यांनी साखर कारखान्यांना उसाचे दर घोषित करण्यासाठी ३० नोव्हेंबरची मुदत दिली होती, अन्यथा कारवाईचा इशाराही दिला होता. पण ३० तारीख उलटून गेली; ना साखर सम्राटांनी काही केले, ना मुख्यमंत्र्यांनी. शेवटी १ डिसेंबर १९९५ रोजी शरद जोशींनी मुख्यमंत्री श्री. मनोहर जोशी यांना पत्र लिहून ऊस उत्पादकांच्या समस्या, सहकाराचे राजकारण आणि झोनबंदी यासंबंधी माहिती देऊन, १४ डिसेंबरच्या आत झोनबंदी रद्द न झाल्यास आपण अनिश्चित कालीन उपोषण करणार असल्याचे कळविले आहे.

•

## हमाऽऽरा बजाऽऽज

देशाला विकासाच्या मार्गावर आणण्यासाठी शेती आणि इतर प्राथमिक व्यवसायांची लूट करून उभ्या केलेल्या कारखानदारीची कर्तबगारी नुकतेच उजेडात आली आहे.

इटलीमधील मिलान येथे जगभरच्या दुचाकी वाहन उत्पादकांच्या उत्पादनांचे एक प्रदर्शन नुकतेच भरले होते. जगभरातील उत्पादकांनी त्यात भाग घेतला होता. 'विजय सुपर'ची निर्मिती करणाऱ्या 'स्कूटर्स इंडिया लि.' या सार्वजनिक क्षेत्रातील सरकारी कंपनीच्या स्टॉलकडे कुणीही ढुंकूनसुद्धा पाहिले नाही यात विशेष काही नाही. भारतातील अग्रगण्य आणि स्कूटर निर्मितीत जगातील दुसऱ्या क्रमांकाची म्हणून नावाजल्या गेलेल्या 'बजाज' कंपनीच्या उत्पादनांचीही या प्रदर्शनात 'निकृष्ट दर्जाची म्हणून' बोळवण झाली. या कंपनीचे 'रेह' नावाचे नवीन मॉडेल बाजारात येऊ घातले आहे. ओंगळ वेल्डिंग, बेंगरूळ रबरी भाग यांमुळे जागतिक बाजारपेठेच्या मानाने दर्जेदारपणाचा स्पर्शही नसलेले मॉडेल म्हणून त्याची संभावना झाली. विदेशी स्कूटर्सच्या आयातीवरील प्रचंड कर, स्पर्धेपासून संरक्षण, निर्यातीला अनुदानाने प्रोत्साहन इत्यादी अनेक सुरक्षाकवचे लाभूनही बजाजसारख्या अग्रगण्य कंपनीची ही अवस्था तर इतर कंपन्यांचे काय झाले असेल?

'स्वदेशी'चा द्या नारा,
घेऊन टाका बजाज खटारा!

**नियोजन हे विकासाच्या मार्गातील अडथळा आहे.**

# ६. त्यागाची संधी

ते संपूर्ण वर्ष सर्व प्राणी गुलामासारखे राबले. पण काम करण्यात त्यांना सुख वाटत होते. त्यांनी कोणत्याही कामात कसूर केली नाही किंवा कसल्याही त्यागाला माघार घेतली नाही. कारण आपण करीत असलेले प्रत्येक काम आपल्या स्वतःच्याच हितासाठी करीत आहोत याची त्यांना जाणीव होती. तसेच हे कष्ट आपण आपल्या मागून येणाऱ्या प्राण्यांच्या भावी पिढीसाठीच उपशीत आहोत याची त्यांना जाणीव होती. सबंध वसंतऋतूत आणि उन्हाळ्यात त्यांनी रोज दहा दहा तास काम केले.

अन्नधान्याच्या उत्पादनात गतवर्षापेक्षा थोडेसे कमी यश मिळाले होते. बटाट्याची लागवड ज्या जमिनीत करावयाची होती ती जमीन पडीक राहिली कारण तिची वेळेवर नांगरट होऊ शकली नाही. त्यामुळे हिवाळ्यात अन्नधान्याची आपत्ती येण्याची शक्यता निर्माण झाली.

पवनचक्कीच्या कामामध्येही अनपेक्षित अडचणी उभ्या राहिल्या. तिथे शेतवाडीच्या आवारात पवनचक्कीच्या बांधकामासाठी लागणारा दगड छोट्याशा खाणीत उपलब्ध होता, पुष्कळ वाळू होती आणि एका खोलीत भरपूर सीमेंटही सापडले होते. परंतु प्राण्यांपुढे पहिली अडचण अशी आली की मोठमोठ्या दगडातून बांधकामालायक लहान दगड बनवायचे कसे? घण, छिन्नी, हातोडे अशी दगड घडवण्याची हत्यारे वापरण्याखेरीज यातून दुसरा काही मार्गच दिसत नव्हता, पण प्राण्यांपैकी कुणालाच ही हत्यारे वापरता येत नव्हती. कारण मागच्या पायावर उभे राहून ही कामे करावी लागत. प्राण्यांनी त्यासाठी पुष्कळ परिश्रम केले. पण ते वाया गेले. शेवटी कोणालातरी, गुरूत्वाकर्षणाचा नियम अमलात आणल्यास ही समस्या सोडवीता येईल अशी कल्पना सुचली.

खाणीतील प्रचंड दगड प्राणी आधी दोराने बांधीत. नंतर गाई, घोडे, मेंढरे वगैरे प्राणी दगड दोरीच्या सहाय्याने जमिनीच्या पृष्ठभागापर्यंत ओढून आणत. तिथून तो खाली ढकलून देत. दगड उंचावरून खाली कोसळला की त्याचे तुकडे तुकडे होत. एकदा दगडाचे तुकडे झाले की ते खालून वर आणण्याचे व पुढचे वाहतुकीचे काम त्या मानाने सोपे होते. घोडे तर गाडी भरभरून दगड वाहून नेत. बेंजामीन आणि म्युरिअलने-सुद्धा गाडीला जुंपून घेऊन आपला वाटा उचलला. उन्हाळ्याच्या अखेरीला दगडांचा पुरेसा साठा झाला आणि प्रत्यक्ष बांधकामा-लाही सुरूवात झाली. डुकरे आता बांधकामाचे 'पर्यवेक्षक' म्हणून काम करू लागली,

उन्हाळ्यात प्राण्यांची स्थिती वाईट नव्हती तरी कामाचे कष्ट फार होते. पण उन्हाळा जसजसा उलटू लागला तसतसा अनेक वस्तूंचा तुटवडा भासू लागला. जनावरांची काही औषधे, खिळे, दोऱ्या, कुत्र्यांची बिस्किटे, घोड्यांच्या नाला, बियाणे वगैरे अनेक वस्तूंची कमतरता तर होतीच पण पवनचक्कीची यंत्रसामग्रीही आवश्यक होती. आता या वस्तू कशा पैदा करावयाच्या याविषयी कुणाला काहीच कल्पना नव्हती.

एका रविवारी सर्व प्राणी पुढील आठवड्यातील कामाचे हुकूम घेण्यासाठी जमले असताना नेपोलियनने नवीन धोरण आखल्याची घोषणा केली. तो म्हणाला- 'या पुढे आपली पशु कृषिसंस्था शेजारच्या शेतीवाड्यांशी देवाणघेवाण करील. अर्थात या मागे कोणताही व्यापारी उद्देश असणार नाही. तातडीच्या गरजेच्या वस्तू आणि पवनचक्कीच्या कामाला लागणारी साधन-सामग्री आपल्याला मिळवावयाची आहे. त्यासाठी मी आपल्या जवळील गवताचा साठा आणि चालू उत्पादनातील काही गहू विकण्याची व्यवस्था करीत आहे.'

पुन्हा एकदा सर्व प्राणी अस्वस्थ झाले. आपण कशामुळे अस्वस्थ होत आहोत हेच त्यांना कळेना. तेवढ्यात नेपोलियन पुढे म्हणाला, 'इतके करूनही योजनेला पैसा अपुरा पडल्यास कोंबड्यांची अंडी विकावी लागतील. पवनचक्कीच्या उभारणीसाठी ही त्यागाची संधी कोंबड्यांना मिळत आहे. त्याबद्दल त्यांनी तिचे आनंदाने स्वागत केले पाहिजे.'

माणसाशी कोणत्याही प्रकारचा व्यवहार करायचा नाही, व्यापार करायचा नाही, हेच ठराव जोन्सच्या हकालपट्टीनंतर केले होते ना?- असा प्रश्न प्राण्यांना सतावू लागला. असा ठराव केल्याचे प्राण्यांना आठवत होते. तेव्हा, सभा बंद करण्यात आल्यानंतर ज्या चार तरूण डुकरांनी आवाज उठविला होता. त्यांनीच आजही बोलण्याचा प्रयत्न केला. पण भीतिदायक गुरगुरणाऱ्या कुत्र्यांनी क्षणार्धात त्यांना गप्प केले. त्यानंतर नेहमीप्रमाणे मेंढरांनी 'चार पाय छान, दोन पाय वाईट' या आवाजाने गोंधळ घातला. अखेरीस शांतता निर्माण करण्यासाठी नेपोलियनने आपला पंजा उचलला आणि घोषणा केली की या संबंधीच्या सर्व व्यवस्था मी अगोदरच करून ठेवल्या आहेत. इतर कुणाही प्राण्याला माणसाच्या संपर्कात येण्याची गरज पडणार नाही. या कार्याचा भार मी स्वतः माझ्या खांद्यावर घेतला आहे. जवळच्याच शहरात व्हिम्पर नावाचे सॉलिसिटर रहातात. त्यांनी पशु-कृषी संस्था आणि बाह्य जग यांच्यात मध्यस्थी करण्याचे कबूल केले आहे. माझ्याकडून सूचना घेण्यासाठी ते आपल्या संस्थेत येतील. त्यानंतर 'पशु-कृषि संस्था चिरायु होवो'या घोषणेने नेपोलियनने आपले भाषण संपविले.

## जनावरांचे शिवार

**जॉर्ज ऑरवेल यांच्या Animal Farm चे भाषांतर : श्री. रमेश मुधोळकर (१९८५)**

### पूर्वसूत्र

**गोठ्याच्या लढाईतील पराक्रमाने स्नोबॉल प्राणिप्रिय झाला होता. त्याने पवनचक्कीचा आराखडा मोठ्या कष्टाने बनविला. पण नेपोलियनचा पवनचक्कीला विरोध होता. संरक्षणविषयक समस्येवरही नेपोलियन आणि स्नोबॉल यांच्यात मतभेद होते. पवनचक्कीबाबत निर्णय घेण्यासाठी मतदानाचे वेळी त्यांची मोठी खडाजंगी झाली आणि नेपोलियनने आपल्या देखरेखीखाली शिकवलेल्या नऊ कुत्र्यांच्या मदतीने स्नोबॉलला पशु-कृषि-संस्थेतून हाकलून लावले. अनेक प्राण्यांनी या घटनेवर प्रतिक्रिया व्यक्त करण्याचा प्रयत्न केला पण कुत्र्यांच्या गुरगुरण्याच्या बळावर त्यांना गप्प बसविण्यात आले. नेपोलियनचे राज्य सुरू झाले. आणि दोनच आठवड्यांनी नेपोलियनने पचनचक्की बांधण्याची घोषणा करून सर्व प्राण्यांना चकित करून सोडले. सर्व पशूंच्याच भल्यासाठी 'डावपेच' करून स्नोबॉलची हकालपट्टी केल्याचे स्क्वीलरने सर्वांना पटवून दिले.**

प्राण्यांना सताविणाऱ्या शंकाकुशंकांचे निरसन करण्यासाठी स्क्वीलरने नंतर दौरा काढला. त्याने सर्वांना खात्रीपूर्वक सांगितले की व्यापार करावयाचा नाही आणि पैसा वापरावयाचा नाही असा ठराव आपण कधीच केला नव्हता. इतकेच नव्हे तर असा ठराव मांडलासुद्धा नव्हता. हा सारा कल्पनेचा खेळ आहे. बहुधा स्नोबॉलने सुरुवातीच्या काळात ज्या खोट्या गोष्टी प्रसृत केल्या त्यामुळेच सर्वांना असे वाटत असेल. एवढे सांगूनही काही प्राण्यांच्या मनात अजून शंका आहे असे दिसल्यावर स्क्वीलर धूर्तपणे त्यांना म्हणाला, 'कॉम्रेड्स, तुम्हाला स्वप्न तर पडले नाही ना? असा ठराव मंजूर झाल्याची तुमच्याकडे लेखी नोंद आहे का?'

ही गोष्ट खरी होती की प्राण्यांकडे असा लेखी पुरावा नव्हता. त्यामुळे आपलीच चूक आहे असे प्राण्याना दिसून आले.

योजनेनुसार दर सोमवारी व्हिम्पर पशु-कृषि संस्थेत येई. उंचीने खुजा पण मोठा धूर्त दिसत होता तो. तो कृषि संस्थेत येई तेव्हा प्राण्यांना त्याचा संशय आणि भीती वाटत असे. प्राणी शक्यतो त्याला टाळण्याचाच प्रयत्न करीत. मात्र नेपोलियन जेव्हा ऐटीत चार पायावर उभा राहून दोन पायांवर उभ्या असलेल्या व्हिम्परला हुकूम सोडी, तेव्हा प्राण्याची छाती अभिमानाने फुलून येई.

जवळपास याच दिवसात डुकरांनी आपला मुक्काम अचानक बंगल्यात हलवला. बंगल्यात कुणीही राहू नये असे आपण ठरविल्याचे प्राण्यांना आठवत होते. पण त्यांचा हा भास खोटा ठरविण्यासाठी स्कलीलरने मोहीम काढली. तो म्हणाला, 'शरीरात जसे मेंदूला महत्त्वाचे स्थान आहे तसें सर्व प्राण्यांमध्ये डुकरांना महत्त्वाचे स्थान आहे. आपला महान नेता नेपोलियन याने उकिरड्यावर रहावे असे तुम्हाला वाटते का?' पण या खुलाशाने प्राण्याचे समाधान झाले नव्हते. कारण डुकरे सैपाक घरात जेवतात, पलंगावर झोपतात अशा गोष्टी त्यांच्या कानावर आलेल्या होत्या. क्लोवरला आठवत होते की पलंगावर कोणी प्राण्याने झोपू नये असा नियम सर्वांनी केला आहे. तिने म्युरिअलला, घेऊन भिंतीवरील आज्ञा वाचण्याचा प्रयत्न केला. 'म्युरिअल' मला जरा चौथे कलम वाचून दाखव. कुणीही प्राण्याने पलंगावर झोपू नये असे त्यात लिहिले आहे ना?' म्युरिअलने वाचून दाखविले, 'चादर टाकून कोणाही प्राण्याने पलंगावर झोपू नये.' हे वाचन चालू असताना स्क्वीलर तीन कुत्र्यांसह त्या बाजूने चालला होता. तो म्हणाला 'कॉम्रेड्स! आम्ही डुकरे पलंगावर झोपतो. हे तुमच्या कानावर आलेले दिसते. पण आपण पलंगावर झोपू नये असा ठराव कधीच केला नव्हता. आणि पलंग म्हणजे तरी काय? झोपण्याची जागा. पलंगाला आपला विरोध नव्हता. आपला विरोध त्यावरच्या चादरीला होता. म्हणून आम्ही पलंगावर चादर न अंथरता खाली-वर ब्लँकेट घेऊनच झोपतो. आमची कर्तव्ये पार पाडताना आम्ही थकल्याभागल्या अवस्थेत असावे असे तुम्हाला वाटते काय? कॉम्रेड्स जोन्स येऊन आपल्या बोकांडी बसावा असे तुम्हाला नक्कीच वाटत नसेल!'.

प्राण्यांनी या मुद्यावर ताबडतोब खात्रीपूर्वक आश्वासन दिले की डुकरे बंगल्यात राहतात व पलंगावर झोपतात याबद्दल कुणाचाही कसलाही आक्षेप नाही.

सराईचे दिवस आले. प्राणी थकलेलेच होते. पण सुखी होते. पुष्कळसे गवत आणि धान्य विकून टाकल्यानंतर हिवाळ्याच्या दृष्टीने अन्नधान्याचा पुरेसा साठा उरला नव्हता. पण पवनचक्कीमुळे सगळ्याच गोष्टींची भरपाई होत होती.

नोव्हेंबर महिना उजाडला तो सोबत भयंकर वादळे घेऊनच. थोडी दलदल असल्याने पवनचक्कीचे बांधकाम थांबवणे भाग पडले. पण एका अंधाऱ्या रात्री मात्र एकाएकी जोराचे वादळ सुटले. बंदुकीच्या आवाजाचा भास होऊ लागला. त्या आवाजाने कोंबड्या खडबडून जाग्या झाल्या आणि भयाने ओरडू लागल्या. सकाळी सगळे प्राणी जेव्हा आपल्या गोठ्यांतून, खुराड्यांतून, तबेल्यातून बाहेर पडले तेव्हा त्यांना भयंकर दृश्य दिसले. ध्वजस्तंभ कोसळून पडला होता. हा प्रकार त्यांच्या नजरेस पडतो न पडतो तोच एकाएकी सर्व प्राण्यांच्या मुखातून निराशेचा चीत्कार बाहेर पडला. त्यांच्या डोळ्यासमोरचे दृश्य अतिशय भयंकर होते. पवनचक्कीचे बांधकाम उद्‌ध्वस्त झाले होते. सारे त्या ठिकाणी धावले. क्वचितच झपाट्याने चालणारा नेपोलियन तर सर्वांच्यापुढे होता. सर्वांना इतके दुःख झाले होते की त्यांच्या तोंडून शब्दच फुटेना. नेपोलियन तर नुसताच येरझारा घालीत राहिला. त्याचे शेपूट ताठरले होते. ते तो सपसप हलवीत होता. त्याच्या मनात विचारांचे काहूर माजले होते. पण अचानक तो स्तब्ध राहिला आणि म्हणाला, 'बंधूनो, हे कारस्थान आहे, याची तुम्हाला कल्पना आहे का?' नंतर ढगांचा गडगडाट व्हावा तसा तो म्हणाला, 'स्नोबॉलनेच केलेले आहे ते. त्याला आपण हाकलून दिले म्हणूनच विखारी दुष्टाव्याने त्याने हे उद्योग केले. कॉम्रेड्स! इथे आता या क्षणी मी स्नोबॉलला मृत्युदंडाची शिक्षा जाहीर करीत आहे. जो कुणी स्नोबॉलला जिवंत अथवा मृतावस्थेत हजर करील त्याला अर्धा मण वजनाची सफरचंदे बक्षीस मिळतील. शिवाय 'पशु-नायक द्वितीय श्रेणी' हा किताब बहाल करण्यात येईल.'

अशा प्रकारचे कृत्य स्नोबॉलसारख्याने केल्याचे ऐकून प्राण्यांना विलक्षण धक्का बसला. सारेजण त्याची निंदा व तिरस्कार करू लागले. टेकडीपासून थोड्या अंतरावर गवतात एका डुकराची पावले उमटली होती. पण बहुधा कुंपणाला जे भगदाड पडले होते तिकडेच ती पावले गेली असावीत. त्या ठिकाणचा वास घेऊन आणि पावलांची तपासणी करून नेपोलियनने निर्णय दिला की ही पावले स्नोबॉलचीच आहेत. त्यानंतर नेपोलियन म्हणाला, बंधूंनो आता उशीर करू नका! आपल्याला पुन्हा पवनचक्की उभारावयाची आहे, आज सकाळपासूनच आपण कामाला सुरुवात करू या. आपण आपल्या योजनेत काडीमात्रही बदल करता कामा नये. आगे बढो! कॉम्रेड्स, आगे बढो! पवनचक्की चिरायू होवो! पशु-कृषिसंस्था चिरायु होवो!'

● ● ●

**विकास ही नैसर्गिक प्रक्रिया आहे**
**बळीराज्य त्याचे निरोगी पर्यावरण आहे.**

# स्वातंत्र्याचा लढा भरात आला आहे

१५ नोव्हेंबर १९९५ रोजी अंबाजोगाई येथील सहकारी साखर कारखान्यावर शेतकऱ्यांनी काढलेल्या हातोडा मोर्चासमोर भाषण करताना श्री. शरद जोशींनी शेतकऱ्यांनी शेतीव्यवसायाला जखडणाऱ्या सरकारी निर्बंधांच्या दंडबेड्या तोडून टाकाव्यात असे आवाहन केले. हे आपले स्वातंत्र्य जाहीर करण्यासाठी आणि नेहरू व्यवस्थेतील निर्बंध रद्द करा म्हणून आदेश देण्यासाठी पुणे येथे साखर संचालकांच्या कार्यालयासमोर साखरमुक्ती मोर्चा आणण्याचे त्याच ठिकाणी ठरविण्यात आले.

२३ नोव्हेंबर १९९५ रोजी या मोर्चासाठी महाराष्ट्रभरातून पंचवीस हजारांवर शेतकरी स्त्रीपुरूष हजर होते. त्यात कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या साथीला नांदेड, परभणी जिल्ह्यातील शेतकरी मोठ्या संख्येने हजर होते.

या मोर्चासमोर भाषण करताना शरद जोशींनी सरकारी निर्बंध झुगारून स्वतंत्र होण्याच्या प्रेरणेने हजर राहिलेल्या सर्व शेतकऱ्यांचे अभिनंदन केले व उसाची झोनबंदी उठेपर्यंत शेतकऱ्यांनी आपल्या लढण्याच्या निर्धारापासून ढळू नये असे आवाहन केले. आपल्या भाषणात त्यांनी महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्र्यांना उसावरील झोनबंदी रद्द करण्याची विनंती केली. ऊस उत्पादकांना सहकारी साखर कारखान्यांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्याच्या या लढाईला जोम येण्याच्या दृष्टीने १४ डिसेंबरच्या आत झोनबंदी रद्द झाली नाही तर, शरद जोशींनी १४ डिसेंबर १९९५ पासून अनिश्चित कालीन उपोषण करण्याचे जाहिर केले आहे.

शरद जोशींची उपोषणाची घोषणा ऐकताच शेतकऱ्यांमध्ये खळबळ माजली. शरद जोशींवर उपोषण करण्याची वेळ येऊ नये म्हणून महाराष्ट्राच्या विविध भागात, झोनबंदी रद्द करण्यासाठी महाराष्ट्र शासनावर दबाव आणण्यासाठी शेतकऱ्यांची आंदोलने उभी राहू लागली आहेत. मागील आठवड्यात कराड येथील कारखान्यावर दोन हजार शेतकऱ्यांचा मोर्चा काढण्यात आला. नांदेड जिल्ह्यात १०,००० शेतकरी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत धरणे धरण्याच्या तयारीला लागले आहेत. सातारा, सांगली, कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकरी कारखान्यांना घेराव घालून त्यांचे काम बंद पाडण्याच्या विचारात आहेत. तरीही १४ डिसेंबरपर्यंत शासनाने काही निर्णय घेतला नाही तर तेही मोठ्या संख्येने उपोषणास बसणार आहेत.

दरम्यान, १२ डिसेंबर १९९५, हुतात्मा बाबू गेनू स्मृती दिनी नांदेड, राजुरा, वर्धा येथून अनुक्रमे १०, ११, १२ डिसेंबर रोजी निघालेल्या स्वातंत्र्ययात्रा नागपूर जिल्ह्यातील नरखेड येथे एकत्र येतील. तेथून मध्यप्रदेशातील पांढुर्णा येथे महाराष्ट्राची सीमा ओलांडून या 'स्वातंत्र्य यात्रे'तील शेतकरी बरोबर आणलेल्या पिशवी पिशवीभर कापसाची विक्री करतील आणि सर्व सरकारी निर्बंध झुगारून स्वतंत्र असल्याचे जाहिर करतील.

●

## शेतकरी हुतात्मा स्मरण

नांदेड येथून १० डिसेंबर १९९५ रोजी सुरू होणारी 'स्वातंत्र्य यात्रा' वाटेत 'सुरेगाव' येथे जाऊन १९८६ च्या कापूस आंदोलनातील हुतात्म्यांच्या स्मृतीला वंदन करतील. १९८६ साली ७ ते १२ डिसेंबर १९८६ या हुतात्मा बाबू गेनू स्मृति सप्ताहामध्ये (ठप्पा मारो आंदोलन) सुरेगाव येथे १० डिसेंबर १९८६ रोजी आंदोलन कर्त्या शेतकरी स्त्री पुरूषांवर पोलिसांनी गोळीबार करून तीन शेतकऱ्यांचे बळी घेतले.

शेतकरी संघटना

## बळीराज्य

३ सप्टेंबर १९९५ रोजी हेर्ले तालुका, हातकणंगले, जि. कोल्हापूर हे गांव लक्ष्मीमुक्ती, दारूदुकानबंदी आणि खुल्या व्यवस्थेच्या स्वीकाराची शपथ या कार्यक्रमाने बळीराज्यात सामील झाले.

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On 6th December, 1995

**To**

**PNCW 281**

Licence to post without prepayment **No. 87**

**SHETKARI SANGHATAK**
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
December 6, 1995

६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.
प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता
अंगारमळा, मु. पो. आंबेठाण (४१० ५०१)
ता. खेड, जि. पुणे.

संपादक, मुद्रक, प्रकाशक
सुरेशचंद्र म्हात्रे
फोन : द्वारा - चाकण ५२३५४/५२४६८
एस्.टी.डी. - ०२१३५

पाक्षिक शेतकरी संघटक
मालक — मोहन बिहारीलाल परदेशी
मुद्रण स्थळ — गणेश प्रिंटर्स,
६९३, बुधवार पेठ, पुणे - २.